| वर्ष - 9 | अंक -141 | UDYAM-MH-26-0158827 |

तीळ गुळ घ्या, गोड गोड बोला



# महाईन्यूज ™

संक्रांतीच्या शुभेच्छा!

www.mahaenews.com | बुधवार, दि. 14 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## महापालिका रणधुमाळी

## मैत्रीपूर्ण लढतीचा मुखवटा फाटला, पुण्यात थेट सत्तासंघर्ष!

# प्रचाराच्या तोफा थंडावल्या!

### भाजपचे 'मिशन 125' संकटात; अजित पवारांची शेवटच्या क्षणातील मास्टरस्ट्रोक

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज






**राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजता थांबला असला, तरी पुणे महानगरपालिकेतील राजकीय संघर्ष अधिकच तीव्र झाल्याचे चित्र आहे. राज्यात सत्तेत एकत्र असलेले महायुतीचे घटक पक्ष अनेक ठिकाणी एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले. मात्र पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई आणि ठाणे या महानगरपालिकांमध्ये जे काही घडले, ते केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपुरते मर्यादित न राहता राज्याच्या राजकारणाची दिशा ठरवणारे ठरले आहे.**

त्यातही पुणे महापालिका म्हणजे भाजप विरुद्ध अजित पवार यांची राष्ट्रवादी – असा थेट सत्तासंघर्ष पाहायला मिळाला. सुरुवातीला 'मैत्रीपूर्ण लढत' म्हणून जाहीर करण्यात आलेला हा सामना प्रत्यक्षात मात्र आरोप–प्रत्यारोप, कुरघोडी आणि इनकमिंगच्या राजकारणाने गाजला.

**भाजपचा आत्मविश्वास : वर्चस्व की अति-आत्मविश्वास?**

2017 मध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांवर निर्विवाद सत्ता मिळवलेल्या भाजपने यंदाही पूर्ण ताकद पणाला लावली. भाजपचे महापौर, केंद्र आणि राज्यातील सत्तेची ताकद, संघटनात्मक बळ आणि इनकमिंगचा सपाटा – या सगळ्यामुळे ही निवडणूक एकतर्फी ठरेल, असा सूर भाजपकडून लावण्यात आला.

100 जागांचा दावा करत सुरू झालेला प्रवास थेट 125 जागांपर्यंत गेला. '165 पैकी 125 नगरसेवक आम्ही निवडून आणू,' असे दावे वारंवार करण्यात आले. अनेक ठिकाणी इतर पक्ष भाजपच्या आसपासही नसतील, अशी वातावरणनिर्मिती झाली. मात्र हाच आत्मविश्वास पुढे भाजपसाठी डोकेदुखी ठरतोय का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

**अजित पवारांची वेळ साधून चाल**

आचारसंहिता जाहीर होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातून स्पष्ट केले की भाजप अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या विरोधात लढणार आहे. टीका होणार नाही, लढत मैत्रीपूर्ण असेल, असे सांगण्यात आले. पण

## महाविकास आघाडी पूर्णपणे नामशेष भाजप–राष्ट्रवादी थेट आमनेसामने मिशन 125 की अजित पवारांचा ब्रेक? | पुण्याचा महापौर कोणाचा?

प्रत्यक्षात प्रचार सुरू होताच हे विधान हवेत विरले. खरा गेम बदलला तो उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी. अजित पवारांनी दोन राष्ट्रवादी एकत्र आणत 'पोलिटिकल टायमिंग' कसं साधायचं, याचा धडा दिला. भाजपमध्ये असलेली नाराजी, उमेदवारी न मिळाल्याने संतप्त झालेले नेते, आणि स्थानिक पातळीवरील अस्वस्थता – हे सगळे अजित पवारांनी अचूक हेरले. अमोल बालवडकर यांसारखा प्रभावशाली नेता, पेठ भागात वजनदार मानले जाणारे धनंजय जाधव, तसेच ठाकरे गटातील अशोक हरणावाळे – या सगळ्यांना शेवटच्या क्षणी एबी फॉर्म देत अजित पवारांनी भाजपच्या गणितात मोठी गडबड केली. ही केवळ इनकमिंग नव्हती, तर पॅनल टू पॅनल, नगरसेवक टू नगरसेवक अशी थेट मॅन-टू-मॅन लढाई होती.

**'मैत्रीपूर्ण' लढतीचा पडदा फाटला**

प्रचाराच्या पहिल्याच आठवड्यात 'मैत्रीपूर्ण लढत' हा शब्द इतिहासजमा झाला. केंद्रीय राज्यमंत्री व खासदार मुरलीधर मोहळ यांनी अजित पवारांवर टीकेची पहिली तोफ डागली. त्यानंतर अजित पवारांनी भाजपच्या तथाकथित 'त्रिकुटा'वर थेट हल्ला चढवला.

**गुन्हेगारी आरोप विरुद्ध विकासाचा दावा**

भाजपने अजित पवारांवर गंभीर आरोप करत 'पुण्याच्या महापालिकेत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले लोक कारभारी होणार का?' असा थेट सवाल उपस्थित केला. आंदेकर कुटुंब, बापू नायर यांसारख्या उमेदवारांवरून हा मुद्दा मांडण्यात आला.

**हमीपत्र : गेमचेंजर की फसवी घोषणा?**

या निवडणुकीतील सर्वात गाजलेला मुद्दा ठरला तो अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे हमीपत्र. पीएमपी आणि मेट्रो मोफत करण्याची घोषणा करत अजित पवारांनी थेट सर्वसामान्य पुणेकरांना हात घातला. भाजपने मात्र ही घोषणा 'फसवी, अव्यवहार्य आणि आर्थिकदृष्ट्या अशक्य' असल्याचा दावा करत जोरदार प्रतिहल्ला चढवला. पत्रकार परिषद, कॉर्नर सभा आणि प्रत्यक्ष प्रचारातून भाजपने या हमीपत्राची हवा काढण्याचा प्रयत्न केला.

**महाविकास आघाडी : अस्तित्वाचाच प्रश्न**

या थेट भाजप–अजित पवार संघर्षात महाविकास आघाडी पूर्णपणे आउटप्ले झाल्याचे चित्र आहे. काँग्रेस, ठाकरे गट आणि मनसे यांची आघाडी कागदावर दिसली, पण मैदानात तिचा प्रभाव नगण्य राहिला.

हर्षवर्धन सपकाळ, सतीश पाटील यांचे तुरळक दौरे, राज ठाकरे यांची शेवटच्या दिवशी मुंबईत घेतलेली पत्रकार परिषद – या सगळ्यांचा पुण्याच्या निवडणुकीवर फारसा परिणाम झालेला दिसत नाही. पुण्यात महाविकास आघाडी आहे की नाही, असा प्रश्न शेवटपर्यंत मतदार विचारत राहिले.

## अंतिम संघर्ष : मिशन 125 धोक्यात?

प्रचाराच्या सुरुवातीला भाजपसाठी सोपी वाटणारी ही निवडणूक अजित पवारांच्या आक्रमक खेळीमुळे आता पूर्णपणे अनिश्चित झाली आहे. शरद पवारांची ताकद, राष्ट्रवादीचे हमीपत्र आणि शेवटच्या क्षणी केलेली अचूक मोर्चेबांधणी यामुळे भाजपचे 'मिशन 125' गंभीर आव्हानात सापडले आहे. 15 तारखेला हजारो उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होईल. 16 तारखेला पुण्याचा महापौर कोणाचा, हे स्पष्ट होईल. मात्र त्याआधीच या निवडणुकीने एक गोष्ट निश्चित केली आहे – पुणे महापालिकेची ही लढत केवळ स्थानिक नाही, तर राज्याच्या सत्तासमीकरणांवर परिणाम करणारी ठरणार आहे.

## अजितदादांचा इशारा मेट्रो, पीएमपीचा प्रवास विनामूल्य करणारच

# भोसरीत बिहारसारखी परिस्थिती!

## ‘मुख्यमंत्री होईनाच काय करू’



।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना डिवचले, त्रास दिल्यास भारंदाज डाव घालून फिरवून फेकून देईन. यांनाच डाव माहिती आहेत का? मी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचा १२ वर्षे अध्यक्ष आहे. मला घुटनाचित कसे करायचे हे माहिती आहे,’ असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजप आमदार महेश लांडगे यांना नाव न घेता दिला. नातेवाइकाच्या नावाने राजगुरुनगरमध्ये कोणी जमिनी घेतल्या, असा सवालही त्यांनी केला. शहरातील वारे फिरले असून, राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर होणार असल्याचा विश्वासही पवार यांनी व्यक्त केला.**

महापालिकेच्या निवडणुकीतील प्रभाग क्रमांक ७ आणि ३० येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ अजित पवार यांच्या सांगता सभा झाल्या. त्या वेळी ते बोलत होते. अजित पवार म्हणाले, ‘महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना २५ वर्षांत माझ्यावर एक रुपयाचाही आरोप कोणी करू शकले नाही. विकासकामे केली. महापालिका आर्थिक मजबूत केली. भाजपच्या राजवटीत नागरिकांना दररोज पाणी मिळत नाही. झोपडपट्टी नसताना हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) लाटून कोट्यवधी रुपये कमविले जात आहेत. येथील आमदाराला मी नगरसेवक, स्थायी समितीचा अध्यक्ष केले. नगरसेवक होण्याअगोदर भंगारच्या गाड्या इकडून तिकडे पोहोचवत होते. काय होते आणि काय झाले आहेत. महापालिकेतील भ्रष्टाचार पाहिल्यानंतर मला पश्चात्ताप होत आहे. शहराचे वाटोळे होत चाललेले पाहून तळपायाची आग मस्तकात जात आहे.’ ‘शहराची वाट लावली. बकाल करून वाटोळे केले. ठेवी मोडल्या, महापालिका कर्जबाजारी केली. भ्रष्टाचारी कीड लागली आहे. शीतलबाग येथील ७० लाखांचा पादचारी उड्डाणपूल सात कोटींवर कोणी नेला, १२ कोटींचे सॉफ्टवेअर १२० कोटी रुपयांवर नेले. सात कोटींचा खर्च केला. पण, एक झाडाची गणना केली नाही. दापोडी ते निगडी जलवाहिनीच्या कामाचा ५६ कोटींचा खर्च ७२ कोटी रुपयांवर गेला आहे. नद्या काळवंडल्या आहेत. या आरोपांवर उत्तर नसल्याने आता भावनिक केले जात आहे. दम देत असून, दहशत माजवत आहेत. त्यांना खड्ड्यासारखे बाजूला करावे’, असे आवाहन पवार यांनी केले.भोसरीत यूपी, बिहारसारखी परिस्थिती झाली आहे. सर्वसामान्य नागरिकाने घराचे बांधकाम हाती घेताच ‘आका’च्या धमक्या येतात. खंडणी मागितली जाते. बांधकाम साहित्य यांच्याकडूनच घेण्यासाठी धमक्या दिल्या जातात. आता सत्ता बदलली, तरच भविष्यात बरे दिवस आहेत. अन्यथा पुढील काळात वाचविण्यासाठी कोणी येणार नाही, असेही अजित पवार म्हणाले.पुणे, पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना मेट्रो, पीएमपी बसचा प्रवास मोफत केला जाणार आहे. मी याचा अभ्यास केला असून, तज्ज्ञांशी बोललो आहे. हे निवडणुकीचे आश्वासन नाही. त्याची अंमलबजावणी करणारच आहे. याबाबतचा निर्णय घेण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाची मान्यता लागत नाही. याचा निर्णय घेण्याचा अधिकार महापालिकेला आहे. शहरातील ५०० चौरस फुटांपर्यंतच्या मालमत्तांना करमाफी दिली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.‘सहा वेळा मुख्यमंत्री

### डाव घालून फिरवून फेकून देईन

‘शहराची वाट लावली. बकाल करून वाटोळे केले. ठेवी मोडल्या, महापालिका कर्जबाजारी केली. भ्रष्टाचारी कीड लागली आहे. शीतलबाग येथील ७० लाखांचा पादचारी उड्डाणपूल सात कोटींवर कोणी नेला, १२ कोटींचे सॉफ्टवेअर १२० कोटी रुपयांवर नेले. सात कोटींचा खर्च केला. पण, एक झाडाची गणना केली नाही. दापोडी ते निगडी जलवाहिनीच्या कामाचा ५६ कोटींचा खर्च ७२ कोटी रुपयांवर गेला आहे. नद्या काळवंडल्या आहेत. या आरोपांवर उत्तर नसल्याने आता भावनिक केले जात आहे. दम देत असून, दहशत माजवत आहेत. त्यांना खड्ड्यासारखे बाजूला करावे’, असे आवाहन पवार यांनी केले.

## पुणेकरांची राजकीय पक्षांकडून अपेक्षा

## स्वच्छतागृहांच्या अभावी विद्यार्थी, नोकरदार, विक्रेत्यांसह पुणेकर त्रस्त




।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता आणि जंगली महाराज रस्त्यावर स्वच्छतागृहांच्या अभावी विद्यार्थी, नोकरदार, पदपथ विक्रेत्यांसह पुणेकर त्रस्त आहेत. महापालिकेच्या निवडणुकीत राजकीय पक्षांनी सार्वजनिक स्वच्छतेच्या मूलभूत प्रश्नावर बोलायला हवे, अशी अपेक्षा पुणेकर व्यक्त करत आहेत.**

नामांकित शिक्षणसंस्था, नाट्यगृहे आणि जगभरातील मोठमोठ्या कंपन्यांची दालने असलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागातील मुख्य रस्त्यांवर स्वच्छतागृहे नाहीत. छत्रपती संभाजी महाराज उद्यान आणि पुलाची वाडी येथे असलेली दोन स्वच्छतागृहे जंगली महाराज रस्त्यापासून आतल्या बाजूला असल्याने सहज सापडत नाहीत. तर, नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावरील रानडे इन्स्टिट्यूटच्या शेजारी असलेले महिलांचे स्वच्छतागृह नुकतेच पाडण्यात आले आहे.

कलाकार कट्टा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा परकीय भाषा विभाग, फर्ग्युसन महाविद्यालय ते पोलीस कवायत मैदान आणि परिसरातील शैक्षणिक संस्थांमुळे नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावर तरुणांचा वावर मोठ्या प्रमाणात असतो. तर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (सीओईपी), बालगंधर्व ते ‘गरवारे सर्कल’पर्यंत नामांकित कंपन्यांची दालने आणि कार्यालयांमुळे जंगली महाराज रस्त्यावर कायम गजबज असते.

मध्यवर्ती भागातील हे दोन्ही रस्ते शहराच्या कोणत्याही ठिकाणी प्रवासासाठी सोयीचे आहेत. मात्र, सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या अभावी कित्येक नागरिकांना आरोग्याच्या गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागते. महिलांना त्याचा विशेष त्रास

### ‘स्वच्छतागृहांचा प्रश्न रोजचाच

मूत्राशयाच्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होत असून, स्वच्छतागृहे वेळेवर उपलब्ध न झाल्याने मानसिक ताण निर्माण होत असल्याचे निरीक्षणही डॉक्टरांनी नोंदवले.नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावरून प्रवास करणारी एक विद्यार्थिनी सांगते, ‘स्वच्छतागृहांचा प्रश्न रोजचाच आहे. मोठी गैरसोय होते. महाविद्यालयात प्रवेश करेपर्यंत मनात भीती असते. कामात लक्ष लागत नाही.’ जंगली महाराज रस्त्यावरही तीच अवस्था असल्याकडे तिने लक्ष वेधले.नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता आणि जंगली महाराज रस्त्यावर स्वच्छतागृहांच्या अभावी विद्यार्थी, नोकरदार, पदपथ विक्रेत्यांसह पुणेकर त्रस्त आहेत.

प्रशासनाकडून तयारी अंतिम टप्प्यात

शहरात २ हजार ६७ मतदान केंद्रे : १० हजार ३३५ कर्मचारी

# मतदानासाठी यंत्रणा सज्ज!

## निवडणुकीत ७१४९ मतदान यंत्रे आणि २९०० कंट्रोल युनिट

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यासाठी पाच दिवसांचा कालावधी राहिला आहे. प्रशासनाने सर्व यंत्रणा सज्ज केली असून, तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. या निवडणुकीसाठी २ हजार ६७ मतदान केंद्रे आहेत, तर मतमोजणी शुक्रवारी (दि.१६) आठ ठिकाणी होणार आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी ३२ प्रभागांत १२८ जागा असून, ६९२ उमेदवार रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ६ व १० मधून अनुक्रमे भाजपचे रती लांडगे आणि सुप्रिया चांदगुडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे आता १२६ जागांसाठी मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी १० हजार ३३५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहरात २ हजार ६७ मतदान केंद्रांमध्ये ७ हजार १४९ मतदान यंत्र (बॅलेट यूनिट), तर २ हजार ९०० कंट्रोल युनिट आहेत.

प्रत्येक मतदान केंद्रावर १ केंद्राध्यक्ष, ३ मतदार अधिकारी, १ शिपाई असेल. केंद्रांकरिता साहित्याचे किट तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. या निवडणुकीसाठी ५२१ वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यात पीएमपीएमएल बसेसचा समावेश आहे. शहरातील मतदान केंद्र असणाऱ्या सर्व शाळांना बुधवारी सुटी जाहीर करण्यात आली आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाकडून आवश्यक तयारी करण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शहर परिसरात पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलिस फौजफाटा व गस्त वाढवण्यात आली आहे पोलि सर्व यंत्रणेवर लक्ष ठेवून आहेत. नागरिकांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक अयोगाकडून करण्यात आले आहे.

### निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदान सुरू

निवडणुकीत निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदानाची सोय केली आहे. ही प्रक्रिया सुरू आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्य इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर टपाली मतदानाची सोय करण्यात आली आहे.

**एकूण मतदार संख्या १७,१३,८९१**

| | |
|---|---|
| पुरुष | ९,०५,७२८ |
| महिला | ८,०७,९६६ |
| इतर | १९७ |
| अनुसूचित जातीची लोकसंख्या | २,७३,८१० |
| अनुसूचित जमातीची लोकसंख्या | ३६,५३५ |

### मतदान यंत्रे सील

महापालिका निवडणुकीसाठी काही मतदानयंत्रांमध्ये उमेदवारांच्या प्रतिनिधीसमोर मतपत्रिका सील करण्यास काही ठिकाणी सुरुवात झाली आहे.

असे रोखणार दुबार मतदान निवडणुकीत तब्बल २२ हजार दुबार मतदार आहेत. या मतदारांच्या यादीनुसार कर्मचारी संबंधित मतदारांच्या घरी जाऊन तो मतदार येथे मतदान करणार असेल, तर अर्ज भरून घेत आहेत. त्या मतदाराचे नाव दुसऱ्या ठिकाणी असल्यास तेथे मतदान केले, म्हणून शिक्का मारला जाणार आहे.

# शांततापूर्ण मतदानासाठी पोलीस यंत्रणा सज्ज

## आचारसंहितेच्या काळात 16 लाख 17 हजार 400 रुपयांची रोकड ताब्यात

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. गुरुवारी मतदान व शुक्रवारी मतमोजणी होणार आहे. निवडणूक शांततापूर्ण, निर्भय व मुक्त वातावरणात पार पडावी, यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून मोठा बंदोबस्त व धडक कारवाया करण्यात आल्या. आचारसंहितेच्या काळात दैनंदिन तपासणीत १६ लाख १७ हजार ४०० रुपयांची रोकड ताब्यात घेतली.**

पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ४२० इमारतींमध्ये एकूण २,१३५ मतदान केंद्रे असून, निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सर्वंकष नियोजन केले आहे. निवडणूकपूर्व बंदोबस्तासाठी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी ३४ तपासणी पथके नियुक्त केली. यासह १,३०६ परवानाधारक शस्त्रे जमा केली. नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी १२ ठिकाणी रूट मार्च काढण्यात आले.

### ९६२ व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई

आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत ९६२ व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली. यामध्ये ५० उपद्रवी व्यक्तींना जिल्ह्याबाहेर पाठविले. 'एमपीडीए'अंतर्गत सात सराईत गुन्हेगारांना स्थानबद्ध, तर 'मोका'अंतर्गत नऊ टोळ्यांवर कारवाई करून ४७ गुन्हेगारांवर कठोर कारवाई केली. याशिवाय ३७ गुन्हेगारांना हद्दपार, तर ४३८ गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना स्थानिक क्षेत्राबाहेर जाण्याचे आदेश दिले.



> निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात नाकाबंदी, गस्त, गुन्हेगार तपासणी व रूट मार्च करण्यात आले. असामाजिक घटकांवर 'वॉच' आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे.
>
> –**विनय कुमार चौबे,** पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड

### अवैध धंदे, अमली पदार्थांवर कारवाई

अवैध मद्यविक्रीविरोधात २७६ छापे टाकून १० लाख ३६ हजार ९७२ रुपयांचा मद्यसाठा जप्त केला. एनडीपीएस कायद्यांतर्गत १८ छाप्यांत ६६ लाख १९ हजार ५३१ रुपयांचा गांजा, एमडी, अंमली पदार्थ जप्त केले.

### अवैध शस्त्रांविरोधात विशेष मोहीम

आचारसंहिता कालावधीत नऊ अवैध पिस्तुले व २३ घातक शस्त्रे जप्त केले. १ नोव्हेंबर २०२५ ते ११ जानेवारी २०२६ या कालावधीतील विशेष मोहिमेत ९१ अवैध पिस्तुले व २२९ घातक शस्त्रे जप्त करून तीनशेहून अधिक गुन्हेगारांना अटक केली.




# पोहा चालला महा'देवा'

**आधी 'तर्रीपोहा विथ देवाभाऊ' व नंतर 'चनापोहा विथ नितीनजी' या दोन्ही प्रचार कार्यक्रमांना राज्यभरात अमाप प्रसिद्धी मिळतेय हे बघून सुखावलेल्या स्पृहा जोशीने गिरिजा ओकला फोन केला तर ती बोलताना अडखळतेय असे तिच्या लक्षात आले. 'मी जिभेवर साखर ठेवलीय, आधी तू तुझा अनुभव सांग' असा संदेश फोन सुरूच ठेवून गिरिजाने केल्यावर स्पृहा बोलू लागली.**

'अगं, तुला काय सांगू? माझीही अवस्था अशीच झाली होती. कसेबसे त्या तिखटाच्या प्रभावातून बाहेर पडले. मला देवाभाऊंकडून निमंत्रण आले तेव्हा वाटले, हलकीफुलकी मुलाखत घ्यायची असेल. मी त्या दृष्टिकोनातून तयारी सुरू केली. पुस्तकाच्या ढिगाऱ्यात खोलवर दडलेले दारव्हेकर मास्तरांचे 'पोहा चालला महादेवा' हे नाटक बाहेर काढले. पुन्हा वाचले. पचमढीच्या नागद्वार यात्रेला जाणारा त्यातला नायक भाविक असतो. तो म्हणजेच पोहा. आता निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले उमेदवारही भाविक. त्यांना देवाभाऊ महादेवाकडे म्हणजेच विजयाकडे नेताहेत अशी कल्पना करून प्रश्न तयार केले पण कशाचे काय? नागपुरात पोहोचताच घ्यायला आलेल्या कार्यकर्त्यांनी मला थेट पोहेवाल्याकडेच नेले. प्रश्न तर आधीच काढलेत पण ते विचारताना झणझणीतपणा आणण्यासाठी तुम्हाला किमान



तीन प्लेट तर्रीपोहे खावेच लागतील असा आग्रह धरला. त्यातून सुटका करून घेण्यासाठी मी माझा सहमुलाखतकार भरत गणेशपुरे कुठाय असे विचारले तर ते विदर्भाचेच आहेत. नेहमीच पोहे खातात. आज तर ते अमरावतीचा 'गिलावडा' खाऊन येणार आहेत. मग नाइलाजाने मला पोहे खावे लागले गं! ती तिखटजाळ तर्री खाऊन जीभ लाल लाल झाली. संत्राबर्फी मागितली तर केवळ एक वडी हातावर ठेवली. बरं झालं, गणेश बरोबर होता. मी कसेबसे हसत एक-दोन प्रश्न विचारले. देवाभाऊंनाच खूप काही सांगायचे असल्याने फार बोलावे लागले नाही. थांब, मी थोडी साखर खाऊन येते, मग तू तुझा अनुभव सांग.' हे ऐकून गिरिजाला हायसे वाटले. मग ती म्हणाली. 'अगं, माझ्याही बाबतीत तेच घडले. मी आधी पुण्यात देवाभाऊंची मुलाखत घेतलेली. तिथे सारेच गोड गोड. प्रश्न आणि उत्तरेसुद्धा! गडकरी परखड बोलतात म्हणून जरा वेगळे प्रश्न काढले. सकाळी निघण्याआधी रात्रभर तयारी केली. त्यांच्या खाण्याच्या चित्रफिती बघितल्या. मुलाखत मस्त रंगेल असे वाटले, पण नागपुरात पोहोचताच आमची गाडी कार्यकर्त्यांनी थेट पोहेवाल्याकडेच थांबवली. नशीब माझे की त्यांनी मला तर्री म्हणजे रस्सा दिला नाही. फक्त चणे व पोहे दिले. चणे एवढे तिखट की घासच आत जाईना. माझ्या डोळ्यांत पाणीच आले. ते बघून तुम्ही तर नागपूरच्याच, आजोळही इथलेच. मग तिखट खाण्यात अडचण काय, असा प्रश्न कार्यकर्ते विचारू लागले. बरे झाले तेव्हा कुणी मीडियावाले नव्हते. नाही तर 'नॅशनल क्रश'ची फजितीच झाली असती. मला फक्त पोहे द्या. चणे नको असे सांगूनही कुणी लक्ष दिले नाही. गडकरी तिखट बोलतात, त्यामुळे तुम्हालाही तसेच प्रश्न विचारण्याची ऊर्मी यावी म्हणून हा 'इंतजाम' असेही एकजण बोलून गेला. व्यासपीठावर मी एकटीच. जीभही बोलायला साथ देईना! तरीही कसेबसे प्रश्न विचारले. गडकरींनाच इतके काही सांगायचे होते की मला फार काही विचारावे लागले नाही. माझे तयार केलेले प्रश्न तसेच राहिले. या तिखटामुळे माझे 'शेड्युल' पार बिघडले गं!' मग दोघींनीही निर्धार केला. कितीही मानधन मिळाले, दबाव आला तरी तिखट पदार्थांचा आधार घेऊन रचलेली मुलाखत स्वीकारायची नाही म्हणजे नाही.'अगं, तुला काय सांगू? माझीही अवस्था अशीच झाली होती. कसेबसे त्या तिखटाच्या प्रभावातून बाहेर पडले. मला देवाभाऊंकडून निमंत्रण आले तेव्हा वाटले, हलकीफुलकी मुलाखत घ्यायची असेल. मी त्या दृष्टिकोनातून तयारी सुरू केली. पुस्तकाच्या ढिगाऱ्यात खोलवर दडलेले दारव्हेकर मास्तरांचे 'पोहा चालला महादेवा' हे नाटक बाहेर काढले. पुन्हा वाचले. पचमढीच्या नागद्वार यात्रेला जाणारा त्यातला नायक भाविक असतो. तो म्हणजेच पोहा. आता निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले उमेदवारही भाविक. त्यांना देवाभाऊ महादेवाकडे म्हणजेच विजयाकडे नेताहेत अशी कल्पना करून प्रश्न तयार केले पण कशाचे काय?

## प्रासंगिक »

# संक्रांतीचा रोख!

***महाकाव्यांत, इतिहासातही नगरे आहेत, हुकूमशाहीतही नगरे हवीच; आपली तर लोकशाही... आपल्या शहरांत पुन्हा प्राण फुंकण्याचा विचार आपण करणार की नाही?***

आज मकर संक्रांत. आजच्या मुहूर्तावर सूर्य मकर राशीत प्रवेश करतो आणि त्याचे उत्तरायण सुरू होते. म्हणजे तो उत्तरेकडे सरकू लागतो. त्यामुळे आजपासून दिवस मोठे होऊ लागतील आणि रात्री आकसू लागतील. वातावरणातील गारवा कमी होऊ लागेल आणि फाल्गुनातील हुताशनी पौर्णिमेनंतर तर ग्रीष्माचा अंगारकाल सुरू होईल. अनेक अन्य सणांप्रमाणे या संक्रांतीच्या सणास एक भौगोलिक, खगोलशास्त्रीय आधार असून त्यामुळे तो अन्य अनेक प्रांतांतही साजरा केला जातो. हा दिवस यंदा मुंबईसह राज्यातील महापालिका निवडणुकांच्या मतदानापूर्वीचा. हा योगायोग सूचक. म्हणजे सर्व धर्म, भाषा, जाती यांचे समाजजीवनी रास्त प्रतिबिंब असलेल्या मुंबईसारख्या महापालिकेची निवडणूक या संक्रांतीच्या पाठीवर 'किंक्रांत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवशी होणे हे या शहराच्या बहुआयामी परिचयास साजेसेच म्हणायचे.

मुंबई इलाख्याचा एके काळचा गव्हर्नर माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन त्या शहरात उच्च शिक्षणाच्या सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात, या विचाराचा होता. १८२४ मध्ये भारतीय विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण देण्यासाठी 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' या नावाची एक संस्था स्थापन झाली होती.

# पहिल्याच सत्रात कंटाळून माघारी

तिच्या विश्वस्तांनी सार्वजनिक स्तरावर आवाहन करून दोन लाख २९ हजार ६३६ रुपयांचा निधी उभारला होता आणि इंग्रजी भाषा व युरोपीय वाङ्मय तसेच विज्ञान इत्यादींचे शिक्षण देण्याचा मनोदय जाहीर केला होता. १८३५-१८४५ या काळात 'एल्फिन्स्टन नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिट्यूट' या नावाने शाळा चालवली जात होती, मग १८४५ मध्ये ते नाव संक्षिप्त करण्यात आले. नुसते 'एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट'. १ एप्रिल १८५६ रोजी त्या शाळेपासून वेगळे असे महाविद्यालय सुरू करण्यात आले, त्यालाही नाव कृतज्ञतेपोटी एल्फिन्स्टनचेच देण्यात आले. १८६० मध्ये ते मुंबई विद्यापीठाशी संलग्न करण्यात आले. अशा त्या महाविद्यालयात पदवी परीक्षेच्या शिक्षणासाठी विश्वनाथ राजवाडे दाखल झाले, ते जानेवारी १८८२ मध्ये. त्या वेळी ते महाविद्यालय महालक्ष्मी विभागात होते. महाविद्यालयाच्या इमारतीतच तिसऱ्या मजल्यावर विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था केलेली होती. त्या



मजल्यावरची तक्तपोशी, कूड वगैरे सर्व लाकडी असल्यामुळे थोडेसे चालले-बोलले, तरीही सगळीकडे गोंगाट माजत असे. त्या तशा वातावरणात अभ्यास करता येणे कठीणच होते. विश्वनाथ राजवाडे तिथे राहायला तयार झाले नाहीत. त्यांनी राहण्यासाठी गिरगावात जागा बघितली आणि तिथून ते महाविद्यालयात आगगाडीने जात-येत असत. त्या महाविद्यालयातल्या पहिल्या सत्रातच राजवाडे कंटाळले. त्यांना हवे होते तसे भरभरून ज्ञान तेथे शिकवणाऱ्या प्राध्यापकांकडून त्यांना मिळाले नाही. मॅट्रिकच्या किंवा महाविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी त्यांनी जे काही इंग्रजी ग्रंथ वाचले होते, अभ्यासले होते, त्यांच्या तुलनेत एल्फिन्स्टन महाविद्यालयात जे शिकवले जात होते, ते नेल्सन या इंग्लिश सेनानीचे चरित्र म्हणजे निव्वळ पोरखेळ असल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली होती. ऑलिव्हर नावाचे एक इंग्रजीचे प्राध्यापक इतके लाजाळू होते की, मान वर करून विद्यार्थ्यांकडे बघत शिकवण्याचे धैर्य त्यांना नव्हते. नॉट ( ठ३) हा इंग्रजी शब्द नकारार्थी आहे, ही 'अपूर्व' माहिती हे महाशय अधूनमधून पुरवत असत. पीटरसन नावाचे संस्कृतचे प्राध्यापक 'विक्रमोर्वशीयम्' या महाकवी कालिदासाच्या नाटकाचे अध्यापन करताना एखाद्या स्त्रीप्रमाणे कोमल, गोंडस आवाजात मूळ संस्कृत वाक्याचे इंग्रजी भाषांतर करायला लागत आणि वाकड्यातिकड्या वाक्याचा किंवा शब्दाचा नेमका अर्थ सांगताना बिचकत. ग्रीक किंवा रोमन इतिहास शिकवायला येणारे प्राध्यापक छापील टिपणांवरून काही तरी पुटपुटत. तर्कशास्त्र सोपे करून समजावणारे प्रा. मॅक्मिलन किंवा बीजगणित आणि भूमिती नीट फळ्यावर शिकवणारे प्रा. हॅथार्नथ्वेट हे दोन प्राध्यापक सोडले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## पैसे वाटपाचा कार्यक्रम सुरु — उद्धव ठाकरे यांचे शिवसैनिकांना आवाहन...

# पैशासाठी आयुष्य विकू नका!

## मुंबई आपल्याच ताब्यात ठेवा



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या पैशांचा धुमाकूळ सुरू आहे. निवडणूकीच्या निमित्ताने दोन दिवस पैसे वाटपाचा कार्यक्रम सुरु राहणार आहे. त्यामुळे पैसे वाटताना कोणी दिसल्यास त्यांना पोलिसांच्या ताब्यात द्या. पण त्या पैशांसाठी स्वतःचे आयुष्य विकू नका. कर्तव्याला चुकू नका, मुंबई आपली आहे, ती आपल्याचा ताब्यात ठेवा, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना केले.**

महापालिका निवडणूकीच्या प्रचाराच्या शेवटच्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी शाखांना भेटी दिल्या. यावेळी मुंबई विमानतळ येथील शाखा भेटीदरम्यान त्यांनी शिवसैनिक व मतदारांशी संवाद साधला. गद्दारी वृत्तीवाले निर्लज्जपणे पैसे वाटत आहेत. ठाण्यात आपल्या आणि मनसेच्या काही उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी कोटींची ऑफर देण्यात आली होती, असा आरोप करत आम्ही केलेल्या कामांच्या जोरावर मते मागत आहोत, तुम्हीही कामे केली असतील तर ती दाखवा आणि निवडणुकीच्या रिंगणात उतरा. पण दाखवण्यासारखे त्यांनी काही केलेले नाही, मात्र, त्यांच्याकडे वाटण्यासाठी भरपूर आहे, असा टोला ठाकरे यांनी लगावला. आता पैसे वाटतानाही त्यांना पराभवाची भीती वाटत आहे. आज आणि उद्याची रात्र त्यांचे पैसेवाटप सुरू राहणार आहे. मात्र, त्या पैशांसाठी स्वतःचे आयुष्य विकू नका. कर्तव्याला चुकू नका, मुंबई आपली आहे, ती आपल्याचा ताब्यात ठेवा. आता झुकाल तर मुंबईला मुकाल, असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला. आपण निवडणूक नाही, तर गद्दार आणि भ्रष्टाचाराच्या वृत्तीविरोधात लढत आहोत. छत्रपती शिवराय आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या आपल्या दैवतांचे पुतळे आज झाकले जात आहेत, आपली मराठी अस्मिता मारण्याचा प्रयत्न होत आहे. आपल्या भाषेवर आक्रमण होत आहे. ही गद्दारी आणि महाष्ट्रद्रोही वृत्ती आहे. या वृत्तीचा पराभव करण्यासाठी मशालीला मत द्यावे लागेल. निवडून दिलेले गद्दार निघतात, मात्र, निवडून देणारे कधीही गद्दार नाहीत, हे दाखवणारी ही निवडणूक आहे. तुमच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या आत्मविश्वासामुळे विजय आपलाच होणार, असा विश्वासही उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. सध्या पैशांचा धुमाकूळ सुरू आहे. निवडणूकीच्या निमित्ताने दोन दिवस पैसे वाटपाचा कार्यक्रम सुरु राहणार आहे. त्यामुळे पैसे वाटताना कोणी दिसल्यास त्यांना पोलिसांच्या ताब्यात द्या. पण त्या पैशांसाठी स्वतःचे आयुष्य विकू नका. कर्तव्याला चुकू नका, मुंबई आपली आहे, ती आपल्याचा ताब्यात ठेवा, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना केलेउद्धव ठाकरे यांनी शाखांना भेटी दिल्या. यावेळी मुंबई विमानतळ येथील शाखा भेटीदरम्यान त्यांनी शिवसैनिक व मतदारांशी संवाद साधला. गद्दारी वृत्तीवाले निर्लज्जपणे पैसे वाटत आहेत. ठाण्यात आपल्या आणि मनसेच्या काही उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी कोटींची ऑफर देण्यात आली होती, असा आरोप करत आम्ही केलेल्या कामांच्या जोरावर मते मागत आहोत, तुम्हीही कामे केली असतील तर ती दाखवा आणि निवडणुकीच्या रिंगणात उतरा. पण दाखवण्यासारखे त्यांनी काही केलेले नाही, मात्र, त्यांच्याकडे वाटण्यासाठी भरपूर आहे.

### स्वतःचे आयुष्य विकू नका

आता पैसे वाटतानाही त्यांना पराभवाची भीती वाटत आहे. आज आणि उद्याची रात्र त्यांचे पैसेवाटप सुरू राहणार आहे. मात्र, त्या पैशांसाठी स्वतःचे आयुष्य विकू नका. कर्तव्याला चुकू नका, मुंबई आपली आहे, ती आपल्याचा ताब्यात ठेवा. आता झुकाल तर मुंबईला मुकाल, असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला.आपण निवडणूक नाही, तर गद्दार आणि भ्रष्टाचाराच्या वृत्तीविरोधात लढत आहोत.

# 'निवडणूक पर्यटक' विरुद्ध 'दत्तक नाशिक'

## उद्धव आणि राज ठाकरेंच्या सभांनंतर नाशिकमधील प्रचार शांत!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जाहीर सभांमधून आरोप-प्रत्यारोप, कुंभमेळ्यासह शहराच्या विकासाच्या दृष्टीने जाहीरनामे, युती व आघाडीत काही जागांवर मैत्रीपूर्ण लढती, आक्षेपार्ह चित्रफितीचे प्रसारण, प्रचारादरम्यान नकली बंदुकीचा धाक दाखविण्याचा प्रकार, तपोवनातील वृक्षतोडीविरोधात मैदानात उतरलेले पर्यावरणवादी, अशा विविध कारणांनी गाजलेल्या नाशिक महापालिका निवडणुकीच्या जाहीर प्रचाराच्या तोफा मंगळवारी थंडावल्या.**

या दिवशी बहुतांश उमेदवारांनी प्रचार फेऱ्या काढून प्रभागात शक्ती प्रदर्शन केले. काहींनी घरोघरी मतदारांच्या भेटीगाठी घेत प्रचाराचा समारोप केला महापालिकेच्या ३१ प्रभागात १२२ जागांसाठी निवडणूक होत आहे. आठ वर्षांनी होणाऱ्या या निवडणुकीसाठी तब्बल ७३५ उमेदवार रिंगणात आहेत.

मोजक्या प्रभागात काही जागांवर तिरंगी लढती तर इतरत्र बहुरंगी लढतीचे चित्र आहे. अपक्षांची संख्या २०८ आहे. निवडणुकीत सत्ताधारी महायुतीत बिघाडी झाली. भाजप स्वबळावर मैदानात उतरल्याने शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला अखेरच्या क्षणी एकत्र यावे लागले. शिवसेना ठाकरे गट-मनसेची युती झाल्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार आणि काँग्रेसची त्यांच्यामागे अक्षरशः फरफट झाल्याचे पहायला मिळाले.



आठवडाभरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसेचे राज ठाकरे, मंत्री गिरीश महाजन आदी नेत्यांच्या सभा झाल्या. उद्योगमंत्री उदय सामंत, पणनमंत्री जयकुमार रावल, शिक्षणमंत्री दादा भुसे आदींनी उद्योजकांसह विविध घटकांशी संवाद साधला. जाहीर सभांमधील आरोप-प्रत्यारोपांनी वातावरण ढवळून निघाले. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी राज्यातील पहिल्याच संयुक्त सभेसाठी नाशिकची निवड करीत वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री फडणवीस, कुंभमेळामंत्री महाजन, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कारभारावर ताशेरे ओढत तपोवनातील वृक्षतोड, दत्तक या सभेच्या दुसऱ्याच दिवशी हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर उपमुख्यमंत्री शिंदे यांची जाहीर सभा झाली. त्यातून ठाकरे बंधूंवर टिकास्त्र सोडले गेले.

### परस्परांवर टीका करणे टाळले

यांनी ठाकरे बंधूंना निवडणूक पर्यटक उपमा देत जोरदार हल्ला चढविला. नाशिकसाठी आतापर्यंत केलेली आणि भविष्यात केल्या जाणाऱ्या कामांची भलीमोठी यादी मांडली. तपोवन वृक्षतोडीविरोधात आंदोलन करणारे डावे अफवा पसरवत असून तपोवनातील जागेचा व्यावसायिक वापर केला जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## १०% पगार कपात करण्याचा निर्णय — तेलगंणा सरकारचा कर्मचाऱ्यांबाबत मोठा निर्णय

# वृद्धांना सांभाळले नाही तर पगार कपात

### छळ करणे ही महागात पडणार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बदलत्या सामाजिक स्थितीमध्ये आई – वडीलांना सांभाळण्यावरुन वाद निर्माण होत आहेत. अनेकदा वृद्ध पालकांना सांभाळण्याबाबत तरुण पिढी ही नकारात्मक असते. यावर उपाय म्हणून तेलंगणा सरकारने (TELANGANA) महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. वृद्धांचा पालकांचा छळ करणे ही महागात पडणार आहे. वृद्ध पालकांना सांभाळले नाही तर होणार १०% पगार कपात करण्याचा निर्णय तेलंगणा राज्य सरकारने घेतला आहे.**



तेलंगणामध्ये, वृद्ध पालकांना त्रास देणे आता मुलांना महागात पडणार आहे. सरकार एक कायदा आणत आहे जो त्यांच्या पालकांची काळजी घेण्यात अयशस्वी ठरणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारातून १० टक्के कपात करणार आहे. हे पैसे कर्मचाऱ्यांच्या खात्यातून कापले जातील आणि थेट त्यांच्या पालकांच्या बँक खात्यात हस्तांतरित केले जातील. यामुळे सरकारी नोकरी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पालकांना न सांभाळण्यास मोठा फटका बसणार आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी या नवीन आणि महत्त्वपूर्ण निर्णयाबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणाले की, जे सरकारी कर्मचारी त्यांच्या पालकांची काळजी घेण्यात अपयशी ठरतील त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. जर वृद्ध पालकांनी त्यांच्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलाविरुद्ध किंवा मुलीविरुद्ध तक्रार दाखल केली तर कर्मचाऱ्याच्या पगाराच्या १० टक्के रक्कम कापली जाईल. ही रक्कम थेट पालकांच्या बँक खात्यात हस्तांतरित केली जाईल, ज्यामुळे त्यांना सन्मानाने जीवन जगता येईल.

सीएम रेड्डी म्हणाले की जे लोक आपल्या पालकांची काळजी घेत नाहीत ते समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरत आहेत. आपल्या वृद्धांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी हे एक मानवतावादी पाऊल आहे. त्यांनी पुढे सांगितले की सरकार ज्येष्ठ नागरिकांसाठी "प्रणाम" नावाचे डे केअर सेंटर देखील बांधत आहे.इतकेच नाही तर तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पीय प्रस्तावांमध्ये नवीन आरोग्य धोरण आणण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की सरकार राज्यातील प्रत्येकाला चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी वचनबद्ध आहे. म्हणूनच, पुढील अर्थसंकल्पात नवीन आरोग्य धोरण आणण्याचा निर्णय घेतला आहे.बदलत्या सामाजिक स्थितीमध्ये आई – वडीलांना सांभाळण्यावरुन वाद निर्माण होत आहेत. अनेकदा वृद्ध पालकांना सांभाळण्याबाबत तरुण पिढी ही नकारात्मक असते. यावर उपाय म्हणून तेलंगणा सरकारने (TELANGANA) महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. वृद्धांचा पालकांचा छळ करणे ही महागात पडणार आहे. तेलंगणामध्ये, वृद्ध पालकांना त्रास देणे आता मुलांना महागात पडणार आहे. सरकार एक कायदा आणत आहे जो त्यांच्या पालकांची काळजी घेण्यात अयशस्वी ठरणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारातून १० टक्के कपात करणार आहे. हे पैसे कर्मचाऱ्यांच्या खात्यातून कापले जातील आणि थेट त्यांच्या पालकांच्या बँक खात्यात हस्तांतरित केले जातील. यामुळे सरकारी नोकरी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पालकांना न सांभाळण्यास मोठा फटका बसणार आहे.तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी या नवीन आणि महत्त्वपूर्ण निर्णयाबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणाले की, जे सरकारी कर्मचारी त्यांच्या पालकांची काळजी घेण्यात अपयशी ठरतील त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. जर वृद्ध पालकांनी त्यांच्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलाविरुद्ध किंवा मुलीविरुद्ध तक्रार दाखल केली तर कर्मचाऱ्याच्या पगाराच्या १० टक्के रक्कम कापली जाईल. ही रक्कम थेट पालकांच्या बँक खात्यात हस्तांतरित केली जाईल, ज्यामुळे त्यांना सन्मानाने जीवन जगता येईल.

### पालकांच्या खात्यात पैसे ट्रान्सफर

सीएम रेड्डी म्हणाले की जे लोक आपल्या पालकांची काळजी घेत नाहीत ते समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरत आहेत. आपल्या वृद्धांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी हे एक मानवतावादी पाऊल आहे. त्यांनी पुढे सांगितले की सरकार ज्येष्ठ नागरिकांसाठी "प्रणाम" नावाचे डे केअर सेंटर देखील बांधत आहे.

# 'सीपीसी'चे शिष्टमंडळ केशव कुंजमध्ये

## भाजपपाठोपाठ संघ मुख्यालयाला सदिच्छा भेट

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे चीनच्या कम्युनिस्ट पक्षाशी (सीपीसी) 'सलोख्या'चे असल्याचा आरोप भाजपने वारंवार केला असतानाच, 'सीपीसी'च्या शिष्टमंडळाने मंगळवारी दिल्लीत संघाच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली. त्याआधी, या शिष्टमंडळाने सोमवारी भाजपच्या मुख्यालयालाही भेट दिली. या गाठीभेटीवरून काँग्रेसने भाजपला लक्ष्य केले.**

चीनचा सत्ताधारी पक्ष असलेल्या 'सीपीसी'च्या सदस्यांनी दिल्लीतील संघाचे मुख्यालय असलेल्या 'केशव कुंज'मध्ये संघाच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेऊन चर्चा करण्याची ही पहिलीच वेळ होती. चिनी शिष्टमंडळाच्या विनंतीवरून झालेली 'सदिच्छा भेट' असल्याचे सांगितले जाते. सरसंघचालक मोहन भागवत दिल्लीत नसल्याने त्यांची शिष्टमंडळाशी भेट होऊ शकली नाही. मात्र, संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे यांच्याशी चिनी सदस्यांनी तासभर चर्चा केली. बैठकीसाठी कोणताही विशिष्ट अजेंडा नव्हता. चिनी प्रतिनिधींना संघाचे काम कसे चालते हे समजून घ्यायचे होते. त्यासाठी या सदस्यांनी संघाच्या मुख्यालयाला भेट दिल्याचे सांगण्यात आले. लडाखमधील चीनची घुसखोरी



व गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर पहिल्यांदाच 'सीपीसी'च्या सदस्यांनी संघ व भाजपच्या नेत्यांची भेट घेतली आहे. काही महिन्यांपूर्वी सरसंघचालक मोहन भागवत यांच्या दिल्लीतील तीन दिवसांच्या व्याख्यानमालेसाठी विविध देशांच्या राजदूत वा प्रतिनिधींना निमंत्रण देण्यात आले होते. मात्र, त्यातून चीनला वगळण्यात आले होते. असे असताना 'सीपीसी'चे शिष्टमंडळ सत्ताधारी पक्ष व त्याचा वैचारिक आधार असलेल्या संघटनेशी संवाद साधत असल्यामुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे. 'सीपीसी'च्या आंतरराष्ट्रीय विभागाच्या उपमंत्री सुन हैयान यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सोमवारी भाजपच्या मुख्यालयालाही भेट दिली होती. भाजप नेते अरुण सिंह आणि विजय चौथाईवाले यांनी या भेटीला दुजोरा दिला. भाजप आणि 'सीपीसी' यांच्यातील आंतर-पक्षीय संवाद वाढवण्यावर चर्चेत भर देण्यात आला. अशी माहिती भाजपच्या या दोन्ही नेत्यांनी 'एक्स'वरून दिली. दोन्ही देशांदरम्यान २०२० मधील गलवान संघर्षानंतर 'सीपीसी' आणि भाजप या दोन्ही देशांच्या सत्ताधारी पक्षांमध्ये ही पहिलीच उच्चस्तरीय भेट होती.

### काँग्रेसने भाजपवर टीका केली

यापूर्वी २००९ आणि २०११ मध्येही दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये गाठीभेटी झाल्या होत्या. भाजपचेतत्कालीन अध्यक्ष नितीन गडकरी यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या शिष्टमंडळाने चीनचा दौरा केला होता. भारताशी असलेले संबंध सुधारण्याचा हा चीनचा प्रयत्न असल्याचेही मानले जात आहे.सीपीसी'च्या शिष्टमंडळाच्या भेटीवरून काँग्रेसने भाजप व संघावर मंगळवारी तीव्र टीका केली.

# कुसुमचा शाहरुख खानच्या गाण्यावर जबरदस्त डान्स!

'ठरलं तर मग' मालिकेत काम करणाऱ्या सगळ्या कलाकारांचा ऑफस्क्रीन एक वेगळा चाहतावर्ग निर्माण झाला आहे. या मालिकेत अर्जुनच्या जवळच्या मित्राची म्हणजेच चैतन्यची भूमिका अभिनेता चैतन्य सरदेशपांडे साकारत आहे. तर, सायलीच्या मैत्रिणीच्या म्हणजेच कुसुमच्या भूमिकेत अभिनेत्री दिशा दानडे झळकत आहे. सध्या मालिकेत सायली-अर्जुनच्या कॉन्ट्रॅक्ट मॅरेजचं भांड फुटून या दोघांमध्ये कुटुंबीयांमुळे दुरावा आल्याचा सीक्वेन्स चालू आहे. पण, सायली-अर्जुनमधली ही कौटुंबिक दरी कमी करण्यासाठी कुसुम आणि चैतन्य मालिकेत नेहमीच भन्नाट कल्पना शोधत असतात.कुसुम आणि चैतन्य यांची ऑफस्क्रीन एकमेकांशी चांगली मैत्री आहे. यापूर्वी हे दोघं एका तामिळ गाण्यावर थिरकले होते. हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला होता. आता या पाठोपाठ चैतन्य आणि दिशा यांनी आणखी एका सुपरहिट बॉलीवूड गाण्यावर डान्स केला आहे.शाहरुख खान आणि काजोल यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'कुछ कुछ होता हैं' हा चित्रपट १९९८ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटाला या वर्षात तब्बल २७ वर्षे पूर्ण होणार आहेत. शाहरुखच्या चित्रपटातील बहुतांश सगळीच गाणी सुपरहिट ठरली. राहुल,



टिना आणि अंजली कॉलेजमध्ये शिक्षण पूर्ण करत असताना एकत्र 'मुझको क्या हुआ है?... कोई मिल गया' या गाण्यावर थिरकले होते. याच बॉलीवूड गाण्यावर चैतन्य आणि दिशा यांनी कमाल एक्स्प्रेशन्स देत जबरदस्त डान्स केला आहे. या दोघांनी सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. यामुळेच या व्हिडीओला अवघ्या दोन दिवसांत १३ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. या व्हिडीओमध्ये कुसुम साडी नेसून तर, चैतन्य ट्रेडिशनल लूक करुन बॉलीवूड गाण्यावर थिरकत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, चैतन्य आणि दिशा यांच्या डान्स व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. "खूप छान... तुम्ही दोघं पण खूप छान आहात", "लव्हली", "डान्स करताना मधुभाऊंना पण घ्या...", "अप्रतिम मस्तच भारी", "NICE कुसुम ताई आणि चैतन्य दादा" अशा असंख्य प्रतिक्रिया लिहित नेटऱ्यांनी या व्हिडीओवर लाइक्स अन् कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.

## 'तुला शिकवीन चांगलाच धडा'

'तुला शिकवीन चांगलाच धडा' ही मालिका १३ मार्च २०२३ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आली. जवळपास दोन वर्षे ही मालिका सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. या मालिकेच्या निमित्ताने प्रेक्षकांना पहिल्यांदाच शिवानी रांगोळे आणि हृषिकेश शेलारची फ्रेश जोडी एकत्र काम करताना पाहायला मिळाली. या दोघांनी मालिकेत अक्षरा-अधिपतीच्या भूमिका साकारल्या आहेत. प्रत्येक आईसाठी 'आयडॉल मुलगा' जसा असतो अगदी तसंच हे अधिपतीचं पात्र आहे. आई भुवनेश्वरीच्या पुढे कोणीही नाही, तिच्या शब्दाबाहेर काहीच नाही अन् तिच्याशिवाय दुसऱ्या कोणाचं ऐकायचं नाही या तत्त्वावर चालणारा अधिपती, कसा साकारायला मिळाला? ही मालिका कशी मिळाली याबद्दल हृषिकेश शेलारने नुकत्याच 'मित्र म्हणे'ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला आहे.

## श्रद्धाच्या फोटोंमुळे चर्चांना उधाण



२०२४ मध्ये श्रद्धा कपूर केवळ 'स्त्री २' च्या प्रचंड यशामुळेच नव्हे, तर पटकथा लेखक राहुल मोदीबरोबरच्या तिच्या कथित नात्यामुळेही चर्चेत आली होती. गेल्या काही काळापासून श्रद्धा आणि राहुल डेटिंगमुळे चर्चेत आहेत. अनेकदा एकत्र दिसल्यामुळे तसेच श्रद्धाने सोशल मीडियावर राहुलबरोबरचे फोटो शेअर केल्यामुळे या चर्चांना उधाण आले. अलीकडेच श्रद्धाचा मोबाईल वॉलपेपरचा एक फोटो व्हायरल झाला, ज्यामुळे त्यांच्या नात्याविषयी पुन्हा चर्चा रंगल्या आहेत. गेल्या आठवड्यात श्रद्धा पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाली, तेव्हा तिने कॅज्युअल पोशाख घातला होता. गुलाबी जॅकेट, निळ्या लेगिंग्सवर तिने केस बांधलेले होते. तिच्याबरोबर एक काळ्या रंगाची जिम बॅग होती आणि ती कारमध्ये जाताना दिसली.कारचा दरवाजा उघडताना, तिच्या फोन स्क्रीनची एका क्षणासाठी झलक पाहायला मिळाली. त्यावर एक वॉलपेपर होता, ज्यामध्ये ती आणि एक व्यक्ती एकमेकांजवळ उभे आहे असे त्या फोटोमध्ये दिसते आहे. यावरून चाहत्यांनी लगेचच अंदाज लावला की तो व्यक्ती राहुल मोदीच आहे, जो श्रद्धाचा कथित बॉयफ्रेंड असल्याचे म्हटले जात आहे.डिसेंबर २०२३ मध्ये श्रद्धाने राहुलबरोबरच्या एका आऊटिंगचा फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला होता. त्या फोटोमध्ये वडा पावची प्लेट दिसत होती, ज्यावर तिने कॅप्शन लिहिले होते, "मी नेहमी तुला वडा पाव खायला नेण्यासाठी त्रास देत राहू का?

## सिद्धार्थ चांदेकर-मिताली मयेकरचं भांडण

सिद्धार्थ चांदेकर व मिताली मयेकर ही मराठी कलाविश्वातील प्रेक्षकांच्या लाडक्या जोडप्यांपैकी एक आहे. या जोडीचा चाहतावर्ग मोठा आहे. अनेकविध कलाकृतीतून हे दोघेही प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसतात. याबरोबरच, सोशल मीडियावरदेखील ते सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. त्यांच्या फोटो, व्हिडीओ, रील्सना प्रेक्षकांची मोठी पसंती मिळते. आता हे सेलेब्रिटी जोडपे पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र काम करताना दिसणार आहे. फसक्लास दाभाडे या चित्रपटाच्या निमित्ताने सिद्धार्थ व मिताली पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहे. या चित्रपटात त्यांनी नवरा-बायकोची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाची सर्वांनाच उत्सुकता आहे. आता मात्र, चित्रपटामुळे नाही तर सिद्धार्थच्या एका वक्तव्यामुळे हे जोडपे चर्चेत आहे. लग्नादिवशीच त्यांचे मोठे भांडण झाले होते, असा खुलासा त्यांनी एका मुलाखतीदरम्यान केला आहे. फर्स्टक्लास दाभाडे या चित्रपटाच्या टीमने नुकताच नवशक्ती या युट्यूब चॅनेलशी संवाद साधला.



## 'ठरलं तर मग'च्या सेटवर मोनिकाचं डोहाळेजेवण

'ठरलं तर मग' मालिकेने गेली दोन वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. या मालिकेत अर्जुनच्या सख्ख्या बहिणीची म्हणजेच अस्मिची भूमिका अभिनेत्री मोनिका दबडेने साकारली आहे. खऱ्या आयुष्यात मोनिका लवकरच आई होणार आहे. काही दिवसांपूर्वीच इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत अभिनेत्रीने ती आई होणार असल्याचं जाहीर केलं होतं. नुकताच अभिनेत्रीच्या डोहाळेजेवणाचा कार्यक्रम पार पडला.मोनिका दबडेचं डोहाळेजेवण 'ठरलं तर मग' मालिकेच्या सेटवर पार पडलं. तिच्या डोहाळेजेवणासाठी सेटवर सुंदर अशी सजावट करण्यात आली होती. याशिवाय मालिकेतल्या सगळ्या अभिनेत्रींनी ऑफस्क्रीन एकत्र येऊन या डोहाळेजेवणाच्या कार्यक्रमात धमाल केल्याचं व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. याचे अनेक INSIDE व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. जुई गडकरी, ज्योती चांदेकर, प्रियांका तेंडोलकर, प्राजक्ता दिघे, श्रद्धा केतकर, दिना दानडे, मयुरी मोहिते, केतकी पालव अशा 'ठरलं तर मग' मालिकेत महत्त्वाच्या भूमिका साकारणाऱ्या सगळ्या अभिनेत्री मोनिकाच्या डोहाळेजेवणासाठी एकत्र जमल्या होत्या होत्या. यांनी तिचं स्वागत करताना सुंदर डान्स केले. अभिनेत्री आई होणार असल्याने तिचे सगळे लाड पुरवून कौतुक केलं. मोनिकाला तिच्या आवडीचे पदार्थ खाऊ घातले. 'ठरलं तर मग' मालिकेच्या निर्मात्या सुचित्रा बांदेकर यांनी देखील या कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती.मोनिकाने डोहाळेजेवणासाठी सुंदर अशी साडी नेसून पारंपरिक लूक केला होता. यावर फुलांचे दागिने, साडीवर 'आई' नाव लिहिलेला बॅच, हातात फुलांची परडी या लूकमध्ये मोनिका खूपच सुंदर दिसत होती. मोनिका व तिच्या पतीने या कार्यक्रमात एकमेकांसाठी खास उखाणे घेतले.

## मुंबईचा ७ विकेट्सने विजय

## कौरच्या अर्धशतकांच्या जोरावर मुंबईने बाजी मारली

# हरमनप्रीत कौरने घडवला इतिहास!

## १९३ धावांचा यशस्वी पाठलाग



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने महिला प्रीमियर लीग स्पर्धेत खेळताना मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. हरमनप्रीत कौर सध्या महिला प्रीमियर लीग स्पर्धेत मुंबई इंडियन्सचं नेतृत्व करत आहे. गुजरात जायंट्स संघाविरूद्ध खेळताना मुंबई इंडियन्सने विक्रमी १९३ धावांचा यशस्वी पाठलाग केला. या धावांचा पाठलाग करताना हरमनप्रीत कौरने नाबाद ७१ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर तिने एख मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. हरमनने महिला प्रीमियर लीग स्पर्धेत खेळताना १००० धावा पूर्ण केल्या आहेत. तिच्या या कामगिरीमुळे मुंबई इंडियन्सच्या विजयाचा आनंद द्विगुणित झाला आहे.**

या सामन्यात पहिल्या फलंदाजीसाठी आलेल्या गुजरात जायंट्सने १९२ धावा केल्या होत्या. मुंबई इंडियन्सला हा सामना जिंकण्यासाठी १९३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना हरमनने आक्रमक सुरूवात केली आणि शेवटपर्यंत उभी राहिली. या सामन्यात फलंदाजीला येण्यापूर्वी तिला हा विक्रम आपल्या नावावर करण्यासाठी अवघ्या काहीच धावांची गरज होती. तिने फलंदाजीला येताच चौकार षटकारांचा पाऊस पाडला आणि हा मैलाचा दगड गाठला. असा विक्रम करणारी ती पहिलीच भारतीय महिला फलंदाज ठरली आहे. याआधी सर्वाधिक धावा करण्याचा विक्रमही तिच्याच नावे होता.हरमनप्रीतने या स्पर्धेतील पहिल्या हंगामापासूनच मुंबईच्या फलंदाजीची एक बाजू धरून ठेवली आहे.तिच्या फलंदाजीचं वैशिष्ट्य म्हणजे, कितीही दबाव असला तरीदेखील ती सयंम ठेवून फलंदाजी करते आणि योग्यवेळी योग्य फटका मारते. त्यामुळेच ती हा मोठा विक्रम आपल्या नावावर करू शकली आहे. असा कारनामा इतर कुठल्याही भारतीय महिला फलंदाजाला करता आलेला नाही.महिला प्रीमियर लीग स्पर्धेत सर्वाधिक धावा करण्याच्या यादीत ती दुसऱ्या स्थानी पोहोचली आहे. तिच्या नावे १०१६ धावा करण्याची नोंद आहे. या यादीत अव्वल स्थानी असलेल्या नेट सिव्हर ब्रंटने ११०१ धावा केल्या आहेत. तर तिसऱ्या स्थानी असलेल्या मेग लेनिंगने ९९६ धावा केल्या आहेत. मेग लेनिंगकडेही १००० धावांचा पल्ला गाठण्याची संधी आहे. एलिस पेरीने ९७२ धावा केल्या आहेत. तिने या हंगामापूर्वी माघार घेण्याचा निर्णय घेतला होता. तर शफाली वर्माच्या नावे ८८७ धावा करण्याची नोंद आहे.नवी मुंबईतील डॉ. डीवाय पाटील स्टेडियमवर सुरू असलेल्या मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात जायंट्स सामन्यात मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि गुजरातला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. गुजरातने ५ विकेट्स गमावून १९२ धावा केल्या आणि मुंबईला १९३ धावांचे लक्ष्य दिले. या धावांचा पाठलाग कलारायला उतरलेल्या संघाची सुरुवात चांगली झाली नाही. जी कमलिनी १३ धावा करून बाद झाली. त्यानंतर हेले मॅथ्यूजही २२ धावा करून माघारी गेली. एकवेळ वाटत होते मुंबईच्या हातातून सामना गेला असे वाटत असताना मात्र संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने अमनजोत कौरला साथीला घेत डाव सावरला. या दोघींनी ७२ धावांची भागीदारी रचली आणि संघाला सुस्थितीमध्ये आणले. अमनजोत कौर २६ चेंडूत ४० धावा करून बाद झाली. त्यानंतर कौरने निकोला केरीसोबत ९३ धावांची भागीदारी रचत संघाला विजय मिळवून दिला. हरमनप्रीत कौरने ४३ चेंडूत नाबाद ७१ धावा केल्या. खेळीत तिने ७ चौकार आणि २ षटकार लगावले. तर निकोला केरीने २३ चेंडूचा सामना करत नाबाद ३८ धावा केल्या. यामध्ये तिने ६ चौकार लगावले. राजेश्वरी गायकवाड, सोफी डिव्हाईन आणि रेणुका सिंग ठाकूर यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.डॉ. डीवाय पाटील स्टेडियमवर सुरू असलेल्या मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात जायंट्स सामन्यात मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला .

### चौकार षटकारांचा पाऊस

गुजरात जायंट्सने फलंदाजी करत ५ गडी गमावून १९२ धावा केल्या. सोफी डिव्हाईन ८ , बेथ मूनी ३३, कनिका आहुजा ३५, ॲशले गार्डनर २०, आयूषी शिवानी ११ , जॉर्जिया वेअरहॅम नाबाद ४३, भारती फुलमाळी नाबाद ३६ धावा केल्या मुंबई इंडियन्सकडून हेले मॅथ्यूज, शबनिम इस्माईल, अमेलिया केर आणि निकोला केरी यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने महिला प्रीमियर लीग स्पर्धेत खेळताना मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

# विराटकडे मोठा रेकॉर्ड मोडण्याची संधी!

## असा पराक्रम करणारा ठरू शकतो पहिलाच फलंदाज



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा माजी कर्णधार विराट कोहली सध्या तुफान फॉर्ममध्ये आहे. याआधी दक्षिण आफ्रिकेविरूद्ध झालेल्या वनडे मालिकेतील सुरूवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये त्याने दमदार शतकं झळकावली होती. त्यानंतर तिसऱ्या सामन्यात त्याने ७७ धावा केल्या होत्या. विजय हजारे ट्रॉफीतील पहिल्या सामन्यात त्याने मोठी शतकी खेळी केली होती. त्यानंतर दुसऱ्या सामन्यातही त्याने अर्धशतक झळकावलं होतं.**

आता न्यूझीलंडविरूद्धच्या पहिल्या सामन्यातही त्याने त्याला शतक झळकावण्याची संधी होती. पण त्याचं शतक अवघ्या ७ धावांनी हुकलं. आता दुसऱ्या सामन्यात त्याला मोठा विक्रम मोडण्याची संधी असणार आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला सामना वडोदऱ्यात पार पडला. या सामन्यात विराटने ९३ धावांची खेळी केली होती. तर दुसरा सामना १४ जानेवारीला राजकोटमध्ये खेळवला जाणार आहे. मालिकेतील तिसरा सामना १८ जानेवारीला इंदुरमध्ये खेळवला जाईल. पहिल्या सामन्यात विराटचं शतक अवघ्या ७ धावांनी हुकलं होतं. दुसऱ्या सामन्यातही तो शतक झळकावू शकतो. न्यूझीलंडविरूद्ध खेळताना केवळ ३ फलंदाज आहेत, ज्यांनी सर्वाधिक ६ शतकं झळकावली आहेत. ज्यात विराट कोहलीसह रिकी पॉंटींग आणि वीरेंद्र सेहवागच्या नावाचा समावेश आहे. जर विराटने न्यूझीलंडविरूद्ध खेळताना आणखी एक शतक झळकावलं तर, यासह तो न्यूझीलंडविरूद्ध वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावणारा फलंदाज ठरू शकतो.विराट कोहलीने आपला फॉर्म पुन्हा मिळवला आहे.तो २०१३ मध्ये ज्या पद्धतीने फलंदाजी करत होता.

### मोठा विक्रम मोडण्याची संधी

उत्कृष्ट फलंदाजी तो आताही करत आहे. पण त्याने आपल्या फलंदाजी स्टाईलमध्ये बदल केला आहे. आधी तो सुरूवातीच्या काही षटकांमध्ये एकेरी दुहेरी धावा घेण्यावर अधिक भर द्यायचा. पण सध्या तो आक्रमक फलंदाजी करण्यावर भर देत आहे. आधी वनडे क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना विराट एकेरी दुहेरी धावा घेण्यावर आणि चौकार मारण्यावर अधिक भर द्यायचा.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
दि. 14 जानेवारी 2026

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## राजमाता जिजाऊ यांच्या 428व्या जयंतीनिमित्त

# ‘अणवाणी पायाने मशाल दौड’!

### “जिजामाता यांच्या आदर्शांचा वारसा जिवंत ठेवण्यासाठी पिढ्या पिढ्यांना प्रेरणा देणारी दौड”

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**राजमाता जिजाऊ यांच्या ४२८व्या जयंतीनिमित्त पुण्यातील लाल महाल पासून मोरेवस्ती, पीसीएमसीपर्यंत आयोजित करण्यात आलेली अणवाणी पायाने मशाल दौड उत्साहवर्धक आणि प्रेरणादायी ठरली. ही दौड श्री गणेश व्यायाम मंडळ व ब्रह्मसिंह गुरुकुल तर्फे पारंपरिक मूल्य आणि इतिहास जपण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आली होती.**

कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते – जिजामातांचे संस्कार, नीतिमत्ता आणि आदर्श आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे. जिजामाता केवळ माता नव्हत्या; त्या राष्ट्रघडविणाऱ्या नेत्या होत्या, ज्यांनी दोन छत्रपतींचे भविष्य घडवले.

या पवित्र दौडीला विशेष प्रेरणा देण्यासाठी भूमी वाबळे ताई उपस्थित होत्या. त्यांच्या शब्दांनी मुलांमध्ये मूल्यांची जाणीव आणि जबाबदारीची भावना निर्माण केली, तर सहभागी मुलींमध्ये आत्मविश्वास आणि धाडसाला नवे आयाम दिले.

धावपटू आरोही बनसोडे, ध्रुविता चव्हाण आणि श्वेता लिमन या धाडसी मुलींनी दौड यशस्वीरित्या पूर्ण केली. त्यांच्या सहभागातून



आजच्या पिढीतील सामर्थ्य, चिकाटी आणि समर्पण स्पष्ट झाले. याशिवाय सत्यम, गणेश, कल्पेश आणि गुणवंत यांनी कार्यक्रमाच्या सुरळीततेसाठी मोलाची साथ दिली. अणवाणी पायाने केलेली ही मशाल दौड केवळ भौगोलिक प्रवास नव्हती; ती इतिहासाला मानवंदना देणारी, मूल्ये जपण्याची आणि राजमाता जिजाऊंचा वारसा पुढील पिढ्यांसमोर जिवंत ठेवणारी आठवण ठरली.

---

## नवोदीत मतदारांसह शेकडो युवकांनी घेतली मतदानाची शपथ

### नवोदीत मतदार पहिल्यांदाच मतदान करणार; उत्सुकता व आनंद

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**प्रत्येक मत हे लोकशाहीचे बळ आहे. मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येकाने आपले मतदानाचे कर्तव्य पार पाडावे, शिवाय सामाजिक बांधिलकीतून आपले कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांनाही मतदानासाठी प्रेरित करावे.भारतीय संविधानाने दिलेला मतदानाचा महत्त्वपूर्ण हक्क बजावून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने मतदान करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महापालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.**



**मराठवाडा संस्कृती**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक १५ जानेवारी २०२६ रोजी होत असून या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली मतदान जनजागृतीसाठी स्वीप उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत निगडी येथील लाईट हाऊस येथे युवकांसाठी मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन जनता संपर्क अधिकारी पुराणिक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी लाईट हाऊसचे पूजा मोगरे, लखन रोकडे, अभिजित कांबळे, दिपाली वाघुळे, अक्षता घारे, लुईस शेळके, छवी राठोड यांच्यासह शेकडो विद्यार्थी, युवक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मतदान जनजागृतीवर आधारित पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. या पथनाट्याद्वारे प्रत्येक मताचे लोकशाहीमध्ये असणारे महत्त्व विशद करण्यात आले. युवकांनी टाळ्यांची साथ देत पथनाट्य सादरीकरण करणाऱ्या टीमचे कौतुक केले. त्यानंतर उपस्थितांना लोकशाहीमध्ये प्रत्येक मत हे अमूल्य असून त्याचे महत्त्व किती आहे, याबाबत युवकांना जनता संपर्क अधिकारी पुराणिक यांनी माहिती दिली. त्यानंतर या कार्यक्रमात उपस्थित सर्व युवकांनी मतदानाची शपथ घेत येत्या महापालिका निवडणुकीत 100 टक्के मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## शिक्षण विश्व : राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले

# मोशीच्या प्रियदर्शनी स्कूलमधील देवांश पवारचे यश

### शाळेचा गौरव वाढवला, अतिशय कमी वयात मानसिक गणितातील उत्कृष्ट कौशल्य

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथील इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या देवांश पवार या चिमुकल्या विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत शाळेचा, पालकांचा आणि मोशी परिसराचा नावलौकिक वाढवला आहे. अतिशय कमी वयात मानसिक गणितातील अफाट वेग, अचूकता आणि एकाग्रतेचे दर्शन घडवत देवांशने हे यश संपादन केले असून, त्याची कामगिरी सर्वच स्तरांतून कौतुकास्पद ठरत आहे.**



राज्यभरातील विविध जिल्ह्यांतून अनेक गुणवान आणि मेहनती विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. तीव्र स्पर्धा, वेळेची मर्यादा आणि अचूक उत्तरांची गरज असलेल्या या अबॅकस स्पर्धेत देवांशने आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला. गणिती प्रश्न सोडवताना त्याचा आत्मविश्वास, गती आणि अचूकता ही त्याची बलस्थाने ठरली आणि अखेर त्याने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

अबॅकस ही केवळ गणित शिकवणारी पद्धत नसून ती मेंदूची क्षमता, स्मरणशक्ती, एकाग्रता आणि निर्णयक्षमता वाढवणारी शैक्षणिक प्रणाली आहे. देवांशने लहान वयातच या शिक्षणपद्धतीचे महत्त्व ओळखत सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. त्याच्या यशामागे केवळ नैसर्गिक बुद्धिमत्ताच नव्हे, तर नियमित सराव आणि चिकाटी हे महत्त्वाचे घटक ठरले आहेत.

देवांशच्या या यशाबद्दल प्रियदर्शनी स्कूलच्या व्यवस्थापनाने, शिक्षकांनी व संपूर्ण कर्मचारी वर्गाने त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील आहे. देवांशसारख्या विद्यार्थ्यांचे यश हे आमच्या शैक्षणिक दृष्टीकोनाची पावती आहे," अशी भावना शाळेच्या व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आली.

त्याचप्रमाणे देवांशच्या अबॅकस प्रशिक्षकांचेही विशेष कौतुक करण्यात आले. योग्य मार्गदर्शन, सरावाची दिशा आणि विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून त्यांना घडवणे, यामुळेच देवांशसारखे विद्यार्थी राज्यस्तरावर चमकू शकले, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले. तसेच देवांशच्या पालकांनीही मुलाच्या शिक्षणासाठी दिलेल्या पाठिंब्याबद्दल आणि प्रोत्साहनाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

देवांशच्या या यशामुळे शाळेतील तसेच परिसरातील इतर विद्यार्थ्यांनाही कौशल्याधारित शिक्षणाकडे वळण्याची प्रेरणा मिळत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून अशा कौशल्यविकासात्मक शिक्षणाची गरज अधिक वाढत आहे. अबॅकससारख्या शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला नवी दिशा देतात, हे देवांशच्या यशातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

प्रियदर्शनी स्कूल ही शाळा केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, मानसिक आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर देत असल्याचे या यशातून अधोरेखित झाले आहे. देवांश पवारचे हे यश केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण शाळा आणि मोशी परिसरासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

संस्थेच्या वतीने देवांश पवारच्या पुढील शैक्षणिक आणि स्पर्धात्मक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या असून, भविष्यात तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही यश मिळवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# बहिणीं'च्या मतांवर डोळा; मत विभाजनाचा फायदा कुणाला?

### योजनेवर दावा; महायुतीतच काट्याची लढत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' वर्ष २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी तारणहार ठरली होती. 'लाडक्या बहिणीं'च्या एकगठ्ठा मतदानामुळे महायुतीचा विजय साकारला होता. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत हीच योजना आता महायुतीसाठी ताकद ठरण्याऐवजी डोकेदुखी ठरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत, यावेळी महायुतीतील घटक पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत.**




विधानसभेवेळी लाभार्थी लाडक्या बहिणींचा कौल एकगठ्ठा महायुतीच्या पारड्यात पडला आणि त्याचा थेट फायदा भाजप, शिंदेसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांना झाला. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत महायुतीतील तिन्ही घटक पक्ष स्वतंत्रपणे रिंगणात उतरले आहेत.

**'लाडकी बहीण' योजना तिघांची, मत मात्र एकच !**

शहरात लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे ३ लाख ८९ हजार ९२० महिला लाभार्थी आहेत. त्यांचा कौल सर्वच ३२ प्रभागांमध्ये उलथापालथ करणारा आहे. त्यामुळे प्रचारात तिन्ही पक्षांचे नेते 'ही योजना आमचीच', 'महिलांसाठी आम्हीच लढलो' अशा श्रेयवादात अडकले आहेत. लाडक्या बहिणींच्या मतांवर तिन्ही पक्षांचा डोळा असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

**मत विभाजनाचा खेळ**

योजनेच्या श्रेयावर तिन्ही पक्षांचा दावा असला तरी लाडक्या बहिणींची मते विभागली जाण्याची शक्यता आहे. भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) आणि शिंदेसेना यांच्यात ही मते फुटल्यास त्याचा नेमका फटका कोणाला बसणार, याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे.



**बहिणींचा कौल कुणाच्या बाजूने ?**

लाडक्या बहिणींचा कौल भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) की शिंदेसेनेच्या पारड्यात पडतो, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. या मतविभाजनाचा राजकीय अर्थ काय आणि त्याचा महायुतीतील अंतर्गत समीकरणांवर नेमका कसा परिणाम होतो, हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs: Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046